# फिनोलेक्स इंडस्ट्रीतर्फे आदिवासी गावांत शौचालये

पुणे, ता. १९ : ग्रामीण भागातील आरोग्य चांगले राहावे, तसेच परिसरातील वातावरण स्वच्छ आणि सुरक्षित राहण्यासाठी फिनोलेक्स इंडस्ट्री व मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने पालघर जिल्ह्यातील सोनले या आदिवासी गावात ५० शौचालये बांधून देण्यात आली आहेत. यामध्ये सौरदिवे आणि पाण्याचीही सोय करण्यात आली आहे. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत सीएसआर फंडातून ही कामे करण्यात आली आहेत.

फाउंडेशनने पालघर जिल्ह्यातील विविध गावांत सीएसआर फंडातून शौचालये बांधून देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. वाडा तालुक्यातील वडवली या आदिवासी गावात झेडएफ स्टिअरिंग गियर कंपनीच्या सहकार्याने ३०, तर एफआयएल आणि एमएमएफ आणि झेडएफ स्टिअरिंग गियरच्या सहकार्याने बवेघर, हम्रापूर, तसेच केव येथे ५० शौचालयांची निर्मिती केली आहे. त्याचे उद्घाटन शुक्रवारी (ता. २१) होणार आहे. वडवली गावातील नागरिकांना दूर असलेल्या नदीवरून पाणी आणावे लागते. यातून लोकांची सुटका करण्यासाठी गावात पाण्याची सोय करण्यासाठी फाउंडेशनच्या पुढाकारातून सोलर पंप बसविण्यात येत आहे. पावसाळ्यात कमी सूर्यप्रकाशातही हा पंप चालविता येणार आहे. या सर्व उपक्रमात सहभाग नोंदविता आल्याबद्दल 'झेडएफ' स्टिअरिंग गियरचे मुख्य कार्यकारी अधिकारी उत्कर्ष मुनोत यांनी समाधान व्यक्त केले आहे.

> योग्य प्रकारे स्वच्छतेची काळजी घेतली गेली, तर रोगांच्या प्रसाराला आळा घातला जाऊ शकतो. त्यातून समाजाचे आरोग्य चांगले ठेवता येते. उघड्यावर शौचाला बसणाऱ्या लोकांच्या मानसिकतेत आम्ही बदल करीत आहोत. या माध्यमातून आम्ही समाजात सकारात्मक संदेश देऊ इच्छितो.
> – रितू छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त, माधव मुकुल फाउंडेशन


NOTICE

...ted Manufacturers / Suppliers / ...wer Station, Uran :

| ... | Sale Period | Last date of submission (up to 15.00 hrs) |
|---|---|---|
| ...h | 20.12.2018 to 14.01.2019 | 15.01.2019 |
| ...y | 20/12/2018, 08:00 IST | |
| ...ts | 31/12/2018, 17:30 IST | |
| | 03/01/2019, 11:00 IST | |
| ...y | 14/01/2019, 16:00 IST | |
| ...o- | 15/01/2019, 15:00 IST | |

...to be paid online only.
...2018 or more details, pl. visit our
...nco.in
Chief Engineer, GTPS, Uran